म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६३४५

# गंधसमीर



REFBK-0013469
REFBK-0013469

भालचंद्र खांडेकर

३७३८८
१२/११/८४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६३६६ वि: काव्य
क्रमांक ९५३५ नों दि

मराठी ग्रंथ संग्रहालय
९३४६९

REFBK-0013469
REFBK-0013469

# गंधसमीर

कवितासंग्रह

भालचंद्र खांडेकर

सिटी बुक स्टॉल, पुणें.

प्रकाशक : सौ. सुशीला कुलकर्णी
विद्यामंदिर प्रकाशन,
३२३ सदाशिव, पुणें २

मुद्रक : भगवान पंढरिनाथ सोमण,
मॉडर्न प्रिंटिंग प्रेस,
३९१ नारायण, पुणें २

मुखपृष्ठ : म. ग. खांडेकर

प्रकाशन : चैत्र शुद्ध पौर्णिमा,
शके १८८५
हनुमान जयंती,
८ एप्रिल १९६३

(C) भालचंद्र खांडेकर

मूल्य : रुपये ३·५०

ती. भाऊकाका दांडेकर

आणि

श्री. शं. दा. भागवत

यांना —

हा माझा तिसरा कवितासंग्रह माझ्या रसिक वाचकांच्या आग्रहावरून प्रकाशांत येत आहे.

पानशेतच्या पुरांत माझ्या पुष्कळशा कवितांचीं हस्तलिखितें अक्षरशः धुवून निघालीं. अशांपैकीं कांहीं कविता माझे स्नेही श्री. विश्वनाथ जोशी, मिरज, यांनीं मला मिळवून दिल्या म्हणूनच त्या या संग्रहांत येऊं शकल्या.

यांतील बहुतेक कविता महाराष्ट्रांतील लहान-थोर नियतकालिकें साप्ताहिकं, वृत्तपत्रें यांमधून प्रथम प्रकाशित झालेल्या आहेत. त्या त्या सर्व संपादकांचा मी ऋणी आहे.

विद्यामंदिर प्रकाशनानें मोठ्या उत्साहानें या प्रकाशनाची जबाबदारी घेतल्यामुळें 'गंधसमीर' वाहतो आहे.

१३५ शनिवार पेठ,
पुणें २.

—भालचंद्र खांडेकर

# अ नु क्र म णि का


गंधवती १

गंधवेडा २

समीरा ! ३

उत्पल ४

सकाळ ५

वारा आणि माती ६

त्या हुतात्म्यांना स्मरा ७

मी फुलावें ८

उमल रे फुला ९

रेंगाळते संध्याकाळ १०

रात्र ११

अंधार मी ! १२

वारा १३

अर्घ्य १४

शोध १५

पूजेसाठीं जन्म माझा १६

उषा १७

कळी १८

माझ्या ओंजळींत १९

कर्णफुलें २०

ज्योति ! २१

माती बोलाविते २२

बारा जुलै एकोणीसशे एकसष्ट २४
अबोली २६
आला आश्विन-कार्तिक २७
फूल लाजत बोलत असतें २९
आली पहांट ३१
मी शकुंतला आश्रमबाला ३३
रूप ३४
स्वप्न ३५
ताटी आड ३६
पदर पोपटी ३७
पुन्हा मात्र मागूं नको ३८
उःशाप ! ३९
चिरंतनाचें अडलें पाउल ४०
पायवाट ४१
ऋण ४२
तूं ! ४३
जन्मलासी तूं फुला— ४४
त्या वेळेला ४५
वसंत ४६
ओढा ४७
ऋतुचक्राच्या चाकांना ४९
चारुते ! ५०
माती अशी मराठी ५१
इतिहासाचीं पानें ५३

| | |
|---|---|
| चाहूल | ५४ |
| भूक | ५५ |
| आन्हिक | ५६ |
| वर्तमान | ५७ |
| वळचण | ५९ |
| आल्या श्रावणाच्या रेघा | ६१ |
| अच्युत | ६२ |
| अंमल | ६३ |
| अशीं स्वप्नें | ६५ |
| सरिता | ६६ |
| देवकी | ६८ |
| खेळ | ६९ |
| प्रपंच | ७० |
| गूज माझ्या अंतरींचें | ७२ |
| पूजा | ७३ |
| समिोल्लंघन | ७४ |
| रंग आणू कोणते | ७५ |
| अभंग माझा | ७६ |
| चित्र मी रेखाटतें | ७७ |
| मला आहे रंगरूप | ७८ |
| ज्ञानाचिया मंदिरीं | ७९ |
| धीट | ८० |

## गंधवती

अधरांत आपुल्या लपवुन मादक गंध
ही कलिका डुलते—, हसते होउन धुंद
आनंद आगळा तिचिया वदनावरतीं
तिज कवळूं बघतो वारा दोन्ही हातीं

जाणून मनींचा त्याचा तो मधु भाव
ती हिंदोळ्यावर खेळत बसते डाव
कधिं शालिनतेनें मधेंच बघते खालीं
कधिं त्याला मिळतो स्पर्श तिचा मखमाली

मग हळूच उघडी मेहिरप ती ओठांची
अन् वारा चाखी लज्जत गंधसुधेची
क्षण दिव्य प्रीतिचा लुटता होय दिवाणी
हळु सांगे वारा गुपीत तिचिया कानीं

तों पहाट थांबे चोरपावलीं दूर
तिज गुपीत उमजे बघुन कळीचा नूर
ते ओठ कळीचे दिसती अजुनी ओले
हळुवार किती जरि समिरानें ते टिपले

त्या क्षणापासुनी तिचें बदललें रूप
हो फूल कळीचें—, गंध आळवी भूप !

मराठी ग्रंथ
१३०८९
दा.क्र.

# गंधवेडा

गंधवेडा वायु घाली
कळ्याभोवतीं थैमान
चारी बाजूंनीं तयांना
पहा करितो हैराण

कधीं कुणाच्या कानांत
सांगतसे हितगुज
दुरूनीच वाजवितो
कधीं कधीं अलगूज

कधीं तरी अचानक
फिरवितो मृदु कर
आणि कळी मात्र होते
मनीं लाजूनिया चूर

कधीं कुणाचे टिपतो
लाल ओठ ओलसर
आणि पाकळी पाहते
चोरूनिया खालीं-वर

चोरपावलांची त्याला
जशी ठावी पायवाट
तसाच तो कधीं कधीं
होतो कामार्त नि धीट !

## समीरा !

गंध माझा नेऊं नको
खेळायला क्षणभर
तुझ्या दृष्टीची ही भूक
जरा समीरा, आवर

माझें जीवन जगाया
एवढीच मला आस
गंधावाचून फुलाला
नाहीं जगामधें वास

गंध जपल्यावाचून
कोण मजला पुशील
पूजेसाठीं जपायाचें
मला माझें शुद्ध शील

नको तुझ्या सांवलीचा
पडूं देऊंस रे, वारा
तुला पाहतां मनांत
जीव होई हा घाबरा

माझ्या मानसपूजेला
नको कुणाचा विटाळ
प्रभूपदीं पडतां मी
जळो गंधाचा कर्पूर

## उत्पल

तुझ्याच सहवासाचें उत्पल
उमलत असतां माझ्यापाशीं
कां न फुलावें हास्य रुपेरी
या मम हृदयाच्या आकाशीं ?

निळी निळी एकेक पाकळी
तुझ्या कृपेचें प्याली अमृत
अवघडलेले भाव मनांतिल
होती पुलकित, हो शब्दांकित !

अथांग भवतीं तुझा नीलिमा
कळीपाकळी तयार झाली
तुझें रूप जणुं प्राशुन घेउन
पराग गळुनी आले खालीं

शब्द जाहले इथें सुगंधित
फुलून येतां अशब्द उत्पल
पिसें गळालीं मौनपणाचीं
दंवबिंदूचा उडला अंचल

# सकाळ

मोगऱ्याच्या पागोळ्यांची
चालू होती बरसात
प्राजक्तहि उभा होता
गंध-भूप आळवीत

थरथरे शुक्र-दीप
पहाटेच्या ओंजळींत
दंहिवराचा पदर
होता तेज सावरीत

आणि लिंबावरी होती
रसरसली सकाळ
होतें उषेच्या दारांत
फुललेलें तेज-फूल

तोंच उमटलीं तिथें
जरा मेंदीचीं पावलें
आणि सहस्रकरांनीं
तेजरंग उधळिले

## वारा आणि माती

कुजबुजतो मातीशीं वारा
घालित तिचिया भाळीं फुंकर
आणिक घेतो दंव गालींचें
टिपून अलगद थोडें नंतर
    माती होतें नकळत पुलकित
    अर्पुन त्याला अपुला गंध
    सुवास प्राशित तोही विहरे
    अलि जेवीं प्राशी मकरंद;
हृद्गत कथिले तो वायूला
काय हवें अन् काय नको तें
निश्वासाच्या शब्दांनीं तो
हुंकार देतो द्याया तें तें
    फिरवित पाठीवरुनी हात
    तिला बोलतो तो अनुरागें
    दूर कितीही गेलों तरिही
    तुझ्याचपाशीं माझे धागे
नकोस टाकूं कधीं उसासे
कधी न व्हावें तूं सखि, व्याकुळ
फुला-फळांचें भरीव लेणें
सदा खेळतें तव अंगावर
    तीही हसते गालीं शालिन
    मिठींत त्याच्या विसावतां क्षण
    त्या तृप्तीचा गंध ओलसर
    उरतो मागें अनंत व्यापुन

## त्या हुतात्म्यांना स्मरा-

या जरा, बांधा चिरा अन् त्या हुतात्म्यांना स्मरा
गौरवाचें शब्द-पाणी घालुनी फुलवा मळा

जेधवां ते गर्जले अन् जेधवां ते झुंजले
आपुल्याशीं बोलण्याला ते न होते मोकळे
आज कोणीही तयांना ओळखी द्या आपुल्या

मात्र हातीं आपुल्या त्यांच्या स्मृतीचें स्मारक
तेवढेंही त्या जिवांना स्वर्गलोकीं पोषक
ओळखीची वाटुं दे ही आपुली त्यांना धरा

आपुला संसार चालावा जगामध्यें सुखें
याचसाठीं जाहले ते या जगाला पारखे
आपुल्यापैकींच तेही — , मार्ग त्यांचा वेगळा !

बांधिलीं त्यांनीं श्रमांनीं रम्यशीं वृंदावनें
जीवनाचें रोप झेली कोंवळीं येथें उन्हें
त्यांतल्या या मांजरीचा वास द्या त्यांना जरा

## मी फुलावें

गीत मी होऊन यावें अन् गतीचे पंख व्हावें
पीस शोधाया परींचें मी सुवासांतून जावें

चांदण्याच्या पाकळ्यांचीं अक्षरें कांहीं खुडावीं
शब्द-फेनाच्या तुषारांनीं त्रिकाळीं रोज न्हावें

सूर द्यावा संगिताला अन् लकेरी भूषवाव्या
सप्तरंगाच्या धनूचे रंग मी अंगीं वहावें

चुंबनें घ्याया उषेचीं मी दंवाचे ओठ व्हावें
पारिजाताच्या पर्दी मैदींतुनी मी रंग न्यावें

मी धुक्याच्या आड माझा चंद्र गोरा झाकळावा
सूर्यकिरणांच्या सतारीला स्वरांनीं आळवावें

श्रावणाच्या हिर्वळीनें मी मला झाकून घ्यावें
अन् शिशीरा बिलगुनीया त्या वसन्ता न्याहळावें

मी फुलावें, मी हसावें, या जगाला तोषवावें
जाग द्यावी जाणिवेला—, हेंच शब्दांनीं लिहावें !

## उमल रे फुला

उमल उमल रे फुला उघड तुझी पाकळी
येतसे हळूहळूं उषा नभांत हासरी

थांबला इथें समीर
गंध वाहण्यास दूर
अंगणांत प्राचिच्या प्रभा प्रसन्न गोजिरी

पाकळींत भावगंध
फुलुन येइ मंद मंद
सौरभास आज वाट दशदिशांत मोकळी !

तो प्रभू पुजावयास,
रे हवें फुलावयास
अंतरंग खोलुनी दाव भक्ति आपुली

# रंगाळते संध्याकाळ

रंगाळते संध्याकाळ
वसुंधरेच्या दारांत
गळां घालतात दोघी
सोनरेशमाचे हात

आहे थोडासा प्रकाश
आहे थोडासा अंधार
एकामेकां तोडायाचा
होत नाहीं मुळी धीर

तिथें क्षितिजाच्या मागें
उभे रुपेरी जहाज
आणि इथें संध्याकाळ
चढविते नवा साज

पण तिलाही जायचे
देई जहाज इशारा
जड पावलें टाकीत
सांज सोडिते किनारा

# रात्र

नीज न येते त्या रात्रीला
डोळयाला ना लागे डोळा
उशा-पायथ्यापाशीं तिचिया
स्वप्नांचा हो चोळामोळा

संध्या बसते तिच्या उशाशीं
आणिक म्हणतेः ' चल ग सजणी
चांदण्यांतली अंगत-पंगत
आपण करुं या दोघी मिळुनी '

जरा टेकते पाठ कुठें तों
पहाट येते घालित फुंकर
कानीं लागुन गुपीत कथितें
घडावयाचें जें क्षितिजावर

जातच स्त्रीची तशांत त्यांची
धावत येती दोघी बाहिर
सूर्य-उषेचें मीलन बघतां
मनांत फुलतो सवती-मत्सर

दिनभर होते असह्य तळमळ
सूर्यमुखाला करत पाठ
कुरवाळी जरि रवि प्रेमानें
ती चंद्राची बघते वाट



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....30.3.88...... वि: ........ काव्य
क्रमांक ......9454...... नों दि: ........

# अंधार मी !

अंधार मी होऊन आलों या उरीं काळी व्यथा
ठाऊक व्हावी कोठुनि मातें प्रकाशाची कथा ?

या लोचनीं आसूं किती मीं साठवावे सारखे
माझे मला तें ज्ञात; आहे तेज मजला पारखें

काळी धरित्री पाहणें, काळोख पाठीं वाहणें
काळ्या कृती जोपासणें, त्यांचीं शिरीं या भूषणें

निर्लज्ज मी आहें सदा स्वातंत्र्य द्यावें मानवा
भीतीस द्यावी चेतना, प्रीतीस दावावा दिवा !

आकाश केव्हांही मला भासे जगीं या सावळें
त्या चांदण्या बोलावतां होतों तयांचें बाहुलें !

काळोख माझ्या मागुती तो खेचितो मागे मला
अन् चंद्र नेई चांदण्या, त्यांना प्रकाशाचा लळा

कोठें कधीं हाकारिते ती रातराणी चोरुनी
जातों तिला धुंडींत तों येते मला ती विल्गुनी

बंदी गडी मी हा परी, माझ्या नशीबीं कोठडी
डोळे असूनी ना दिसे माझ्या जिवाचा सौंगडी

दुर्दैव माझें भोगतों मी जन्मठेपीची सजा
साऱ्या जगाला मात्र मीं द्यावी विसाव्याची मजा !

## वारा

भिऊन गेला भुईस वारा
आणिक लागे थरथर कापूं
मनांत म्हणतो : "वसुंधरेला
दोन करांनीं कुठवर व्यापूं ?

थंड सदाची झेलत आहे
मी देतों तीं वस्त्राभरणें
वृक्ष-लतांच्या केशापाशीं
गुंतुन बसतें गीत दिवाणें

अधरावरचे ऊष्ण उसासे
टिपून घ्यावे शीत करानें
परंतु तिचिया मुखकमलावर
नाही हासूं लोभसवाणें"

—हसणारे हसतात उगीचच
म्हणती वारा पिसाट वेडा
कस्तुरीचा हा गंध वाहतो
जिला मनांत न यावा ओढा

## अर्घ्य

उगवत्या भास्कराचे
भूमि वंदिते चरण
गहिवरे दहिवर
तिच्या लोचनीं दाटून

पहाटेच्या पावलांना
पारिजाताचा सुवास
वारा सुगंधी गुंतला
क्षितिजाच्या आसपास

दिनकराच्या पुजेला
लता गुंफितात माळा
आनंदाच्या पोटामध्यें
आतां न मावे न उमाळा

उत्साह हा देई अर्घ्य
सरितेच्या हातांतून
पूर्वेचिया अंगणांत
अता उभे नारायण

## शोध

पाकळ्यांच्या पंखांतून
गंधाची ये झुळझुळ
रंगामध्ये गुंग होई
मात्र आपुल्याशीं फूल

परिमलाचा पदर
जरी उडे वाऱ्यावर
नाहीं जाणीव फुलाला
त्याचें हृदय निर्मळ

गंध-धुंदींतील मिठो
कितिकांना सोडवे ना
परिमल आवरता
हातीं फुलाच्या मावेना

हरवून बसलें तें
आपुलाच परिमल
हृदयाच्या कुपींतील
कसें उडालें अत्तर

परिमल अजूनही
त्याच्या भवतीच आहे
फुलणारें फूल आतां
वेडा गंध शोधताहे !

# पूजेसाठीं जन्म माझा

पानांचिया पाळण्यांत
डोलणारें एक फूल
आत्तांच मी टाकताहें
जगीं पहिलें पाऊल

माझा रंग, माझा गंध
माझें रूप गोड गोड
पुरविल काय जग
माझें मनांतील लाड

दिसतसे सभोंवार
किती सुंदर हें जग
त्यांत जगायाची आहे
माझ्या मनीं तगमग

गंध माझा उधळून
जगाला या सुखवीन
पानांचिया पाळण्यांत
मुदें डोलत राहीन

पण पानापलिकडे
आहे नवखी चाहूल
पूजेसाठीं जन्म माझा
देवाघरचें मी फूल

## उषा

पंगू पायाचा अरुण
धावूं लागला आकाश
उषा उराशीं धरते
त्याचा स्वर्ण करपाश

आणि जप जपतांना
ओघळे करींची माळ
दवबिंदू विर्घळले
तेज उरे रानोमाळ

थकली ही पळतांना
आली कितीक योजनें
आता दीर्घ धापा टाकी
तिचीं चाललीं स्पंदनें

क्षितिजाच्या अंगणांत
मागें राहिली आरती
संध्याभेटीच्या ओढीनें
रवि धावतो पुढती

जाणूनिया त्याचा भाव
लावून शुक्राची वात
कंठितसे रोज रात
फुटेपावेतों पहाट

## कळी

कुसुम व्हायचें आज कळीला
गूज सांगते ती वेलीला
लाज आडवी येते म्हणुनी
पानामागें वदन झाकुनी
थेंब दवाचे हळूच टिपुनी
म्हणे : बोलवा रविकिरणाला

गंध लेउनी अंगावरती
डोकावुन बघते ओलेती
मनांत घेउन अबोध भीती
शहारते ही गंधित बाला

अधरीं तिचिया अस्फुट कांहीं
कविता फुलुनी ये भावमयी
त्या स्वप्नीं ती बहरुन जाई
तिला व्हायचें फूल पुजेला

## माझ्या ओंजळींत

अरे, माझ्या ओंजळींत
तुला झेलेन मी फुला,
नाहीं तोलता येणार
माझ्या ओंजळीची तुला

तुझ्या सुगंधाला हवें
माझ्या करांचें कोंदण
तुझ्या भोंवती खुलेल
अंजलीचें वृंदावन

तुझ्या रंगगंधाची रे,
माझ्या ओंजळीला शोभा
पानाफुलाहून येथें
आहे आगळीच प्रभा

तुझ्या पाकळ्यांत माझीं
बोटें गुंफतील गाणीं
माझ्या ओंजळीनें कधीं
नाहीं गाइली विराणी

अरे, माझ्या ओंजळींत
फुलायाचें तुला फुला
कुणासाठीं जन्मलास
हात माझ्या अंजलीला

## कर्णफुलें

हिरव्या पाचूचीं तुझीं
कर्णफुलें जीं कानांत
तुझीं चेष्टितें वाहतीं
अनुरागाच्या रागांत

कधीं देतांच मानेला
हिसडा तू लटकासा
घेतात ती सुंदरसा
तुझ्या कपोलीं वळसा

तुवां जरा रेखाटतां
रुकाराची उभी रेघ
चमकून जाते तिथें
क्षण अचानक वीज

तुझ्या ओष्ठमहिरपीं
अस्फुटसें फुटे स्मित
तेव्हां त्याची प्रभा करी —
कर्णफुलां अलंकृत !

तुझा डाव, तुझा भाव
कर्णफुलांनाच ज्ञात
तुझ्या कानीं डोलतांना
तुझें चित्र रेखतात.

## ज्योति !

तुला जगायाचें आहे
एका रात्रीचें जीवन
वेचून घे आनंदानें
लाभलेला क्षणक्षण

तुझ्या तेजाच्या प्रकाशीं
उजाडूं दे सभोवार
पण नको होऊंस तू
गडे, प्रकाशाचा हे८

फुलणारे फुलोत ते
एकांताच्या अंधारांत
तुझ्या सहवासाची तू
त्यांना जराशी दे साथ

नको मात्र तू होऊंस
प्रेमिकांना कधी साक्ष
तुझ्या समीप तयांना
तुझ्याविना लाभे मोक्ष

एका रात्रीच्या जिण्यांत
सुखी-आभाळ उजळ
नको पतंग जाळूंस
फुटेपावेतों सकाळ !



१३४६९
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलमत.
अनुक्रम ३७३६६ वि:
नों: वि: १२-११-६४

# माती बोलाविते

माती बोलाविते रोज
आकाशींच्या प्रकाशाला
आणि सांगते कानांत–
"घेऊन जा तिमिराला.

नको नकोसा होतो रे,
त्याचा मला सहवास
त्याच्या मिठीच्या पाशांत
जड होई माझा श्वास.

त्याचें काळें काळें रूप
सारा काळा व्यवहार
वाट चुकती सज्जन
असूनहि वाटेवर

पाहवत नाहीं कधीं
त्याचे क्रीडातुर खेळ
भावनांचा त्याचा माझा
कधींच ना बसे मेळ.

अंधारांत अंधेरी ये
नाहीं मिळत विसावा
दमलेला देह माझा
सांग कसा रे, जपावा !

तिमिर हा खेळवितो
भोंती जरी शीत वात
कशी प्रसन्नता यात्री
त्याच्या पाशवी करांत ?

गडे, तुझा दाह बरा
अशा शीत मिठीहून
तुझ्या तेजांत जगेन
किंवा जळत मरेन"

# बारा जुलै
# एकोणीसशे एकसष्ट

पंचमहाभूतांवर
करी मानव बढाई
परि थांबतां थांबेना
इथें अजून लढाई

विझवाया आगडोंब
बोलाविती पर्जन्यास्त्र
जीवनानें जीवनाला
दिली मूठमाती मात्र !

अंधाराला अंधाराचें
भय नव्हतें वाटलें
कल्पनेच्या कोषांतहि
स्वप्न नव्हतें दाटलें

असा कांहींसा मिळाला
विज्ञानाला कारावास
आभासाच्या भोंतीं भोंतीं
फिरूं लागे गळफास

चित्रगुप्त लिहितसे
रोज रोजची डायरी
त्याचीं पानें नकळत
झालीं आसवानें ओलीं

कधी पेटला होता का
इथें जगड्व्याळ जाळ ?
शांत करुनिया त्याला
उरे सुकलेला गाळ

--नाही म्हणाया दिसतो
तिथें अरुण केशरी
आणि चंद्र गगनांत
आहे अजून रुपेरी

## अबोली

हिरवळींत कां हसेनास तूं
स्वप्न मुलायम पाहत असतां
बोल मनांतिल कां न बोलसी
ओठावरतीं पहाट फुटतां ?

बोलुं लागते कशी अबोली —
तुझिया अंबाड्यावर बसतां,
खळखळणारें नदींतलें जल
हासत गाठी पुढचा टप्पा.

आणि तरीही तुझ्या लोचनीं
भास तरळती मदिर क्षणाचे
शब्द हरवले कां हिमगौरी ?
थेंब थांबले इथे दंवाचे !

तुझ्या स्मिताच्या अस्फुट रेषा
हळूच फुलतीं ओष्ठसम्पुटीं
मधुसूदन कीं बससी पूजित
गोकुळांतली होउन गोपी !

# आला आश्विन-कार्तिक

आला आश्विन-कार्तिक
आला शरद दारांत
त्याचे पद उमटले
शेवंतीच्या अंगणांत

आज दंवाच्या थेंबांना
चढे मोतियाचें तेज
रांगोळीच्या रेघांतून
अंगणांत रुजे वीज

गारव्याच्या स्वागताला
ऊब आखडते पाय
अधराच्या माधुरीला
कुणी लावितसे साय

रंग पोपटी पळाला
गोंदुनिया पानें-फुलें
चांदण्याच्या अक्षरांचे
अर्थ आज आकारले

कुठें कळीच्या मिठींत
गंध राहिला कोंडून
गालीं ओशाळती अर्धे
लाजणारे श्वास ऊन !

पळे पहांट नाचत
पदीं गुलाबी पैंजण
ऊब घेऊन धावती
मागे सूर्याचे किरण

# फूल लाजत बोलत असतें

आपण चालतों आपली वाट
कधी मैदान, कधी घाट
आपला रस्ता नाकासमोर
कारण आपण नसतो मोर !
तेव्हढ्यांत नेतें कुणी लुटून
कळत नाहीं-कोण कुठून !
कांहीं क्षण होतो भास
भास कुठला ? धुंद वास !
आणि वाट वाकडी होते
मन कसें वेडें बनतें.
छे ! आंतून पालवत असतें.
कारण ?
–फूल लाजत बोलवत असतें.

पाकळयांचे ते मिस्किल ओठ
प्राशून घेतात कांहीं घोट
जरा दाखवून शुभ्र दात
हळूच घेतात झांकून आंत
आतिथ्याची असली रीत
केवळ डोळ्यांत बोलकें गीत !
देतें थोडा फेकून वास
वाटसरूला होतो फास.
तेव्हां पाकळी हसते गालीं
कारण मागे असते लाली !

भ्रमांत पडतात भाव फुके
कांहीं मुके, कांहीं भुके
कळत नाही काय चुके.
सारे श्रेय गेलें असतें
याचें त्याला, त्याचें याला
आणि मग हळहळ उरते
कारण ?

– फूल दंवांत भिजून जातें.

वाटसरू चुकतो वाट
फूल बांधीत असतें गांठ
एक धागा धुंदीचा
एक धागा वासाचा
एक धागा सुखाचा
दोन पदर, लाजरी नजर
उरत नाहीं तेव्हां कदर
कळत नाहीं घडतें काय
बधीर होतात वाटेंत पाय !
पायवाट बघते वाट
घाट बसतो चोळींत हात !
इकडे काय घडलें असतें
फूल पूजेंत गढून जातें
कारण ?

– फूल लाजत बोलत असतें.

## आली पहांट

केशरी रंगाची घटका-पळें
पाहून फुललीं कोमल फुलें
ओलांडुनीया रात्रीचा घाट
आली पहाट !

ओले ओले गाल टिपते उषा
दंवाचें वस्त्र नेसती दिशा
करांत घेऊन तेजाचा घट
आली पहाट !

काळोखाची काल मऊमऊशी
घेऊन उशाला जर्तारी उशी
चंद्राच्या कुशींत काढून रात
आली पहाट !

गिळतो चंद्रमा मूक वेदना
प्रकाशाची ओढ हिचिया मना
ओठांत गाते ही प्रकाश-गीत
आली पहाट !

एकच राहिला शुक्राचा तारा
संपला तयाचा आता पहारा
यौवनसुलभ झाली ही धीट
आली पहाट !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 30366 दि: ..........
क्रमांक .......... नों. दि. 22-7-68

तेज हें जीवन, तेजच प्राण
तेजांत अपुलें व्हावें मीलन
धरूनी हव्यास उराशीं दाट
आली पहाट
आली पहाट !

## मी शकुंतला आश्रमबाला

मी शकुंतला, आश्रमबाला
भ्रमरा, कां छळतोस मला ?

मला न ठाउक असलें कूजन
आगळाच ये ध्वनी तयांतुन
तुझ्यासवें मज छळतें यौवन
जीव घ्यायचा खेळ कशाला ?

इथें गाठुनी मला एकटी
टाकतोस कां अशा संकटीं
बोलहि अडले माझ्या ओठीं
अशी कशास्तव करिसी लीला ?

देहाभंवती अशी साखळी
नव्हती कोणी कधींच केली
सोड मला रे, सोड मोकळी
भीती असते कुमारिकेला.

## रूप

सुगंधाच्या अंगावर
गंध करितो शिंपण
फूल एक दंवांतील
हळू पाहतें लाजून.

मंद धुंदींत कांहींशा
पाकळीच्या ओठावर
गीत रचिते मधुर
ओलसर दहिवर !

वारा होऊनिया भृंग
येई न्यावया सुवास
मधु-दानाची तरळे
फुलाच्याहि मनीं प्यास.

रंग-गंधाची ही कला
ज्ञात कधींची फुलाला
आणि नाजुक मनाचा
विभ्रमहि ठावा त्याला.

गंधित ही सुंदरता
ल्याली आगळेंच रूप
तिच्या पोटीं दडलेला
जीवनाचा या हुरूप !

## स्वप्न

आज मनाच्या तळाशीं
बसे फेसाळ चांदणें
शब्द फुटेनासा झाला
ओठावर विरे गाणें

गंध पोटांत ठेवून
कळी मुकीच राहिली
फुलायाची आठवण
आज फुलें विसरलीं

स्वप्न वावरत होतें
गोड मधुर स्वप्नांत
कंप वेडा हरवला
स्पर्शमय संभ्रमांत

आणि रेंगाळला सूर
जरा घेऊन आलाप
समेवर पडायाची
आहे अजुनीया थाप.

# ताटी आड

ताटी लावून बसले
आंत निश्चित ज्ञानेश
मुक्ताबाई म्हणतसे--
"सोडा ज्ञानदेवा, रोष."

ताटीआड लपलेले
ज्ञानदेव नोहे—; ज्ञान !
अंधारांत उगवला
मांगल्याचा दिव्य क्षण.

आज सोनियाचा दिस
तेव्हापासून दिसतो
ज्ञानेश्वरीच्या ओवींत
रस आकंठ नाहतो.

# पदर पोपटी

पदर पोपटी खांद्यावरचा
चाचपसी तू अगदी अलगत
त्यावेळीं तो तव कानाशीं
असतो कांहीं रहस्य बोलत.

रहस्य ऐकुन झोके घेतो
कानामधला हिरवा पोपट
अन् गालावर चोंच तयाची
ठेवुन जाते हिरवी लज्जत.

हिरवा प्रकाश पाहुन गालीं
तेज गुलाबी हो रोमांचित
अन् तें येतें गालावरतीं
थोडें हांसत, थोडें लाजत

- रंगदेवता प्रसन्न तुजला
तुझिया हातीं सदैव मृगजळ
पुसूं नको हा रंग पोपटी
ना तर भाळीं येइल हळहळ.

# पुन्हा मात्र मागूं नको

शरदाच्या चंद्रापरी
उतट तू हसू नको
काजळ प्यालेल्या तुझ्या
पापण्यांनी पाहू नको.

तुझे प्राजक्ताचे ओठ
पुन्हा पुन्हा टिपूं नको
आणि भुवयांचे सेतु
दोघांमध्यें बांधु नको.

स्पंदनाचें ऊन ऊन
आमंत्रण धाडूं नको
तुझी फणा डोलवाया
पुंगी माझ्या करीं नको

अशी घरोब्याची रीत
हिशेबांत मला नको
होय-नाहीची ही भाषा
अधांतरी बोलूं नको

दान द्यावयाचें तर
अज्ञानांत ठेवूं नको
एकदा देशील जें तें
पुन्हा मात्र मागूं नको.

## उःशाप !

शापाला उःशाप नसावा
घडलें का कधिं असें पुराणीं ?
आजच कोठुन या नियतीला
केवळ ये शापाची वाणी ?

यावें कोठुन तें गतवैभव
फिरली दुनिया, फिरला सौदा
वाणीला का वाण पडावी
एकतर्फिचा आज निवाडा.

जीवन जळतें शापित होउन
तरी व्यथा का अजुनी मागे
सुंभ जळाला तरी जळूं दे
इथे पिळाचे उरले धागे.

अपवादाविण नियम न होतो
उःशापाविण शाप कसा मग ?
सुटे न कोडें या शापाचें
असह्य होतें सदैव तगमग

## चिरंतनाचें अडलें पाउल

चिरंतनाचें अडलें पाउल
पुढे यायला त्यास न संधी
अजून उरली आहे मागे
अस्थिरतेची ओली चिंधी

इथें चालला भव्य सोहळा
लुडबुडणाऱ्या क्षणिक क्षणांचा
मानपान हे अपमानांचे—
झेलित झिजती तळच्या टाचा !

जाणिव जाते घेउन अक्षत
शाश्वतिला द्यायास निमंत्रण
स्वप्नांचें परि राज्य येथलें
या विश्वावर त्याचें दडपण.

गती घेउनी गीतहि थिजतें
ओठांवर शब्दांना शोधित
टाळ अभंगाचा मग चुकतो
चुकलेली मात्रा चुचकारित !

## पायवाट

आली आली पायवाट
माझ्यासाठीं पायाखालीं
नेणार ती आहे आतां
मला अपुल्या पावलीं

आज माझ्या पायाखालीं
तिने काया अंथरिली
आणि तिला तुडवीत
चालायाचें माझ्या भाळीं

तिला केवळ ठाऊक
माझ्या मंदिराची वाट
नेणार ती चालवीत
धरूनीया माझा हात

दूर तिथें मंदिरांत
उभें आहे माझें सुख
माझ्या सुखामागें परि
गिळते ती मूक दुःख.

तिने हात धरोनिया
न्यावें मला चालवीत
माझें पौरुष जगाया
हवा मला तिचा हात.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 36366 ...... दि: ..................
क्रमांक ........................ नों दि 22.7.68

# ऋण

कधींच नव्हती केली जवळिक
इतकी तुझियापाशीं येउन
ठाउक होतें जरी मला की
तुझ्यामुळे मी जगतों जीवन

कधींच नव्हतें मनांत आलें
की लागावें तव कानाशीं
अन् सांगावी व्यथा उरांतिल
तू देसी, मी परी उपाशी

कधींच नव्हते बंध मुळींही
हरिणगतीच्या मनोरथाला
पण धावावें तरी कोंठवर
जरि तू असशी सारथ्याला

कधींच नव्हती तुला काळजी
तुझ्या जिवाची तुझ्या कृपेची
तुझ्या कृपेनें झालों पावन
गती थांबली मात्र गतीची

म्हणून केली इतकी जवळिक
अगदी तुझियापाशी येउन
सांग तरी मी कुठल्या जन्मीं
फेडायाचें हें असलें ऋण

# तू !

स्वप्न पहावें हिरवें हिरवें
ज्यात विलक्षण क्षण सोनेरी
त्याच क्षणांनी त्या स्वप्नांतुन
घ्यावी साकारून भरारी

अतृप्तींतुन व्हावी तृप्ती
अशी अकल्पित, अशी अचानक
स्वप्नाच्या गर्भांतुन यावें
सुंदरसें सत्याचें बालक

होइल जर का असें जगावर
देइल हें जग दुवा खरोखर
सौख्याने फुलणारें हें जग
याचिल का तुजला कधि कणभर

तुझी दया अन् सदैव करुणा
हवी कशाला, हवी कुणाला ?
जो तो आहे दुःखी म्हणुनी
तुजला नाही विसरुन गेला

मोठ्यांचें परि हृदयहि मोठें
म्हणून स्वार्थी जगास या तू
देसी अपुली सदा आठवण
ठेवुन हातीं त्यांचे हेतू

## जन्मलासी तू फुला -

जन्मलासी तू फुला, अन् लोपली रे ती कळी
तू फुलावें, तें पहावें ही तिची आशा खुळी

आपुल्या रूपा पहाया लोप व्हावा आपुला
केवढें धारिष्ट्य हें, मृत्युंजयी ही रे, कला
जन्मदात्रीला परी ना खंत त्याचीही मुळी

मूक होत्या भावना कोषामधें ज्या चंदनी
त्या तुझ्या या पाकळ्यांनी ठेविल्या जोपासुनी
गंध श्वासाला तुझ्या देऊन गेला तो बळी

याच होत्या पाकळ्या तेव्हा कळीच्या त्या कुशीं
यौवनाची मोहिनी आहे परी पुष्पा, अशी
जन्म घेणाऱ्या जिवाची हीच आहे साखळी
फूल व्हावें आपुलें आशा कळीची ही खुळी

## त्या वेळेला

जेव्हा बसतो मोजित तारे
आणि नभींच्या नक्षत्रांना
कुंठित होऊन जाते बुद्धि
गिरक्या घेती विचार नाना

जेव्हा वाटेवरुनी जातां
मिळे न विश्रांतीही घडिभर
पाहू जाता वृक्ष-सावली
दिसते भवती केवळ बाभळ

जेव्हा झरतो झरा उन्हाचा
माझ्या गेहीं कौलारांतुन
नको वाटती असल्या धारा
अंगावरती घ्याया शिंपुन

अशा जगीं या जगण्यासाठीं
मला दिसेना जरा उबारा
परी अचानक त्या वेळेला
येसी पुढती धीर द्यायला

## वसंत

शिशिराच्या पावलांना
चैत्र-कस्तुरीचा वास
दहिवर मनीं घेई
कोंवळ्या उन्हाचा ध्यास

हात जोडोनीया उभे
आज वृक्ष दारोदारीं
हवें दान पालवींचें
हवी कोकिळ-बासरी

ठेवी चोरूनिया चाफा
पोटीं केतकीचा रंग
हात हिवाळी पाहतां
अणु-रेणु चोरी अंग

गोडी लावून लपला
कधी एकदा वसंत
सहवास सुखाची त्या
लागे सगळ्यांना खंत

# ओढा

ओढा घेतो मनीं ओढ
धावणाऱ्या नदीकडे
नदी निनादवीं करीं
हिरव्या लाटांचे चुडे

खळखळ वाहणारें
त्याचें जीवन उघडें
आंत-बाहेर ना ठावें
– त्याला गुपीत वावडें !

भावनेचा वेग कधी
ओढ घेई अनिवार
म्हणे, " नदी, थाम्ब जरा-
जीवन हें धन्य कर ! "

किनाऱ्याच्या कांठावर
ओढा बांधी वृंदावन
आणि तिथें नदीसाठी
जीवनाचें करी दान

ओढ्याची या आहे ओढ
धुंदवेड्या नदीकडे
वाहतो हा तुडवीत
कुठे रेती, कुठे खडे

–परि नदीच्या मनाचा
ओढ्याला ना लागे ठाव
सागराच्या भेटीसाठी
सरितेची पुढें धाव

# ऋतुचक्राच्या चाकांना

ऋतुचक्राच्या चाकांना
फिरविते दैवगती
बारा मास पळतात
तुडवित पदीं माती

कसा मिळावा विसावा
ऋतुराजाच्या रथाला
नव्या वैभवाचें लेणें
हवें सदा मेदिनीला

इथें धावणारें जग
ठायीं ठायीं धावपळ
उसंत ना टेकायाला
कुणालाहि क्षणभर

मानवाच्या जगामध्यें
नियतीची अनुकृति
काळ थांबला का कधीं
जगावर कुणासाठीं ?

निसर्गाच्यापुढें आतां
मानवाची उद्या उडी
पाहयाचें आधीं कोण
लागणार पैलथडी !

## चारुते !

चारुते, जगाचे नयन सुखविण्यासाठीं
तूं हास्यमुखानें वससी या भूवरतीं
ही किमया केवळ तुझिया आस्तित्वाची
नसती जर तर मग घडगत नव्हती अमुची

या फुलाफुलांतुन विविध विनटले रंग
अन् जलाशयाचे रम्य निळे भ्रूभंग
त्या प्राजक्ताच्या पदास लावुन मेंदी
कुणि लावियला तो ' मित्र ' उषेच्या नादीं ?

चंद्राला अर्पुन हात रुपेरी शीत
तूं स्पर्शहि करिसी वायूचा रंगीत
ते दुरुन साजरे डोंगर दावुन रम्य
सुखदुःखामधले धागे विणासि अगम्य

मन प्रसन्न व्हावें सदैव तुझियासंगें
या विचारांत जग अपुल्याशींच तरंगें
तू दिससी केव्हां होउनिया साकार
जाणवे शरीरा स्पर्श तुझा हळुवार

कधिं रसनेचेही पुरवित बससी लाड
हे इंद्रियधात्री, तुझें न उकलें गूढ

# माती अशी मराठी

जन्मास येथं आल्या कीर्तीसवेंच मूर्ती
खेचून घे यशश्री माती अशी मराठी

वार्णात गुंफियेले ओवी तसे अभंग
संसार व्यापुनीही जे राहिले निःसंग
ते संत पंढरीचे होते पुजेंत दंग
ना जातिभेद त्यांना, भक्तीवरीच प्रीती
माती अशी मराठी

सह्याद्रिच्या कड्याचा उत्तुंग ताठ माथा
त्याच्या कुशींतुनी ये तो मावळी मराठा
ठाऊक त्यांस होत्या गुंफा नि आडवाटा
या मातिचाच होता त्यांच्या टिळा ललाटीं
माती अशी मराठी

छुमछुन् कधीं पदींचे ते नाचलेत चाळ
लावण्य लावणीचें खुललें इथें खुशाल
अन् थाप शाहिरांची घुमवी अजून बोल
मर्दास मर्द भिडला मिळवून हात हातीं
माती अशी मराठी

गोमांत-रूप-गौरी, सौंदर्य रोमरोमीं
पायीं समुद्र वेडा, दुर्गांत दिव्य लेणीं
भूमीवरी कला त्या गातें सुरेल गाणीं
पाहून तृप्त व्हावें शोभा नभांत रात्रीं
माती अशी मराठी



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३७०३६६ वि:
क्रमांक ................. नों दि
९३४६९

रत्नें कितीक आलीं जन्मास या ठिकाणीं
येथें समर्थ झाली ज्यांच्या मुखांत वाणी
फाळांत नांगराच्या लक्ष्मी नि चक्रपाणी
ती भूमि धन्य, येथें उन्मेष नांदताती
माती अशी मराठी

## इतिहासाचीं पानें

आजकालच्या या शब्दांचें
त्या अर्थाशीं तुटलें नातें
चमकुन जातें दोघामधुनी
'प्रतिमां'चें कधिं लख्‌कन पातें।

भावनांतले भाव बिथरती
बघून ही उलटी अंबारी
वरच्या रेघेवांचुन आल्या
अधांतरी शब्दांच्या ओळी

गंध फुलावा सोन्यामधुनी
पुढें कल्पुनी वेडा चंपक
बघणाराहि पाहत बसतो
नाकळणारें गूढ अनामक.

अशीं अक्षरें डोळ्यापुढती
येतीं नाचत, जातीं हासत
अमुच्या इतिहासाचीं पानें
आम्ही आहों पुढेंच उलटित !

# चाहूल

आली तेजाची ही लाट
कशी वाहत वाहत
दिसे ज्योतीचा कलश
क्षितिजाच्या ओंजळींत

पूर्वेचिया पायांतल्या
अंधाराचें काळें पातें
पडे तिथेंच मोडून
त्याचे जडे नवें नातें !

कांही नवीन आकार
येई नव्या दिवसाला
प्रकाशाच्या गळ्यांतील
स्वर सुगंधित झाला

थकलें भागलें पर्व-
गेलें, आता तें संपलें
आकाशाच्या झोपेमध्यें
स्वप्न केशरी रंगलें !

किरणांनी हळूहळू
पसरले पुढे कर
एक नवखी चाहूल
आज छेडिते सतार

# भूक

दवापरी फुलावरी
बसण्यांत वाटे सुख
सरितेच्या जलापरी
सदा वाहण्याची भूक

तेजाभोंवती हिंडाया
व्हावें प्रकाशाचें पीस
रजनीला भेटावया
घ्यावा तिमिराचा वेष

समीराच्यासवें कधीं
वाटे जावें मी खेळत
गंधजेच्या पंखावर
धुंद पडावें लोळत.

आनंदाच्या जलाशयीं
डुंबावेत माझे दिन
सदा व्हावी अंगावर
प्राजक्ताची पखरण

सौंदर्याला असा कांहीं
हवा सुखाचा आकार
ज्यांत सामावून जाई
विवंचनेचें आभाळ !

## आन्हिक

विसरायाचें म्हटलें तरिही
तुझ्याच स्मृतिंनी होतों व्याकुळ
तुझ्या मनींचे रंगित चाळे
कानोकानीं देती चाहुल.

तुझ्याच हातांची ही किमया
पदन्यासही तुझ्या पदांचे
या चरणांना आणि करांना
चित्र स्पर्शिते तुझ्या कृतिचें

प्रसन्नता ही तव हास्याची
नीरवता तव अस्तित्वाची
विस्मरणाच्या या दुःखावर
पाखर पडते तुझ्या स्मृतीची

तुझ्या स्मृतीचा हा पापुद्रा
बसलेला माझ्या जखमेवर
दूर तरी मी कसा करावा
अगदी अलगद तो वरच्यावर

विसरायाचें म्हटलें तरिही
इतकी केली परि तू जवळिक
की तुझियाविण मुळी न होईं
माझें दैनंदिन हें आन्हिक

# वर्तमान

रथ काळाचा चालला
तुडवित रानें-वनें
कितितरी वाचियेली
याने कालचीं पुराणें

सदाचीच याच्यावर
चाललेली पुष्पवृष्टि
परि भविष्याकडेच
याची लागलेली दृष्टि

रंगला हा प्रवाहांत
जसें पाणी तसा रंग
तरी अजूनहि याचें
आहे तेजःपुंज अंग.

नटविला, खुलविला
कालपावेतों वीरांनीं
याचें सारथ्य करून
आणिला हा अशा स्थानीं

अश्व उधळिले याचे
कितिवेळा रानोमाळ
त्यांना खेंचतांना गेलें
किती धारातीर्थीं बळ.

भविष्याची याला ओढ
याचें नांव वर्तमान
कथा आजच्या वाचून
बनवितो हा पुराण.

आजवर ज्यांनी ज्यांनी
केली आहे याची पूजा
देहदंडाची तयांनी
भोगियली आहे सजा.

रथ काळाचा चालला
याचें नांव वर्तमान
आजचें हें याचें रूप,
वीर-बाहूंचें भूषण.

# वळचण

एक असे मी साधी वळचण !

माझी जागा अगदी टिचभर
तिथें परी मी उभवी घरकुल
आश्रय देइन येइल त्याला
असेल त्यांतच करिन निवारा
पाय टेकुनी उभे रहाया
जरी भासते सदैव अडचण
स्वागत घ्यावें हें स्वीकारुन.

ऊन-पावसामधें उभी मी
तरी तुम्ही या माझ्या धामीं
तुमच्या सहवासाची भूक
तुम्हास देते सदैव हाक
मोल न मजला तुमच्यावांचुन
करीत राहिन तुमचें रक्षण !

कोंड्याचा घ्या करुनी मांडा
इथेंच अपुलीं पानें मांडा
दोन शब्द तुमच्या सौख्याचे
भाग्य मिळूं दे ऐकायाचे

कुशल तुम्हां सर्वांचें ऐकुन
जाइन मीही क्षण आनंदुन
सुदाम-घरचे माझे पोहे
आवडतिल का तुम्हास पण हे ?
रुची असो वा नसो तयांना
हें प्रेमाचें मम पाचारण
भगवंताला बंधू मानुन !

# आल्या श्रावणाच्या रेघा

आल्या श्रावणाच्या रेघा
नाचत या अंगणांत
रूप मेघांचें हें नवें
काढलेलें रेघोट्यांत.

चुरा ढगांचा करून
धावतसे पुढें पाणी
घालुनीया हिर्वा चुडा
आली आली वर्षाराणी !

पेटलेल्या उन्हाळ्याची
शांत होय जरा आग
अता निघती हिंडाया
फडा काढुनिया नाग

आजच्या या ओलाव्याला
येई चंदनाचा वास
रात पांघरी लोकर
घ्याया उबेंतला श्वास

जाती श्रावणाच्या रेघा
अंगण हें सारवून
उद्या सकाळीं येणार
इथें भाद्व्याचें ऊन.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 36366 वि: ........
क्रमांक ........ नों. दि. 7-2-79-६४

## अच्युत

स्नान झालें धरणीचें
वर्षेतल्या पहांटेला
आणि हळू हळू पुढें
सूर्यनारायण आला.

हातांतील कमंडलू
ओती कांचनाचें नीर
तीर्थ घेई वसुंधरा
सावरित केशभार.

वस्त्र तिचें अंगावर
आहे थोडें थोडें ओलें
ओलेती ती अजूनही
अंग नाही टिपलेलें.

अता अन्नदेवतेचें
करायचें तिला ध्यान
ध्यान करितां करितां
व्हायची ती ध्यानमग्न !

आणि दिसेल जगाला
तिचें सोनियाचें रूप
तिच्या उदरीं वाढतो
अन्नरूपाने अच्युत !

# अंमल

तुझ्या गात्रीं फुलतसे
नवी वसंत पालवी
अंग-अंग प्रकटवी
नेत्रदीपक माधवी

ग्रीष्म सोडितसे श्वास
तुझ्या नासिकेच्या वाटे
त्याची वेडी दाहकता
जरा अधराला चाटे.

वर्षेला ये बिलगून
श्रावणाचें गोड पाणी
त्याची झळाळी आगळी
दिसे तुझिया लोचनीं.

तुझ्या सहवासीं खुले
शरदाची शीतलता
धुंद चांदण्याला येई
एक शुभ्र अथांगता.

तुझ्या रूपांतून खेळे
हेमंताचा गोरा हात
भाव लाजरे बुजरे
आकारतात तोऱ्यांत.

आणि शिशीर चोरटा
तुझें चोरतो यौवन
परी तुला न सांगतां
तुझें खुलतें लावण्य !

तुझ्या देहावर चाले
सहा ऋतूंचा अंमल
कुणाकुणाला यांतून—
सांग गुंगारा देशील ?

## अशीं स्वप्नें

निळ्या स्वप्नांना रेखित
मिटे हळूच पापणी
निळ्या निळ्या वलयांत
फेर धरी निद्राराणी !

पापण्यांच्या कुंचल्यांचा
स्वैर चालतो विलास
घेई प्रमत्त आकार
जागा झालेला आभास

भव्य लेणीं कोरितात
निळ्या स्वप्नांचे हातोडे
शामल करांनी कुणी
तिथें घाली धुंद सडे

अशीं स्वप्नें, अशा रेखा
नीज जोजविती रोज
हले वायूचा पाळणा
त्याला चांदण्याचा साज !

## सरिता

किनाऱ्याला बिलगून
पडे लोळत सरिता
आणि कुरवाळी त्याला
घाशी कुशीमध्यें माथा

त्याला असा वेडावून
करी मंद फेन-स्मित
तिच्या उरींचा अंचल
पडे मात्र अस्ताव्यस्त

खळखळ वाहतांना
सांगते ती त्याच्या कानीं--
" राया, रहा पडून तू
घोटभर घेई पाणी "

धीर-गंभीर किनारा
घेई जागींच विसावा
सरितेच्या मनांतलि
त्याला कळो ये न कावा !

मग उठते हळूच
किनाऱ्याला थोपटून
निघे सागर-भेटीला
पदीं लाटांचे पैंजण

सरितेच्या कुशीमध्यें
स्वप्न पाहतो किनारा
म्हणे मनाशीं, " सरिते,
तुला माझाच निवारा "

सदुसष्ट

## देवकी

अजून या यमुनेच्या काठीं
राधा भरते घट पाण्याचा
अजून वारा घुमतो आहे
मुठींत घेउन स्वर बन्सीचा

दरवळणारा गंध फुलांचा
कुंजवनाचे लुटतो रंग
चाचपते कुणि चमकुन गोपी
पाठीवरचे कृष्ण भुजंग

गवळ्यांमधला पेंद्या अजुनी
शोधित आहे राधारमणा
डेऱ्यामधलें लोणी जपतें
मंत्र मनाशीं : "ये रे कान्हा"

वाट पाहते काळी यमुना
गोविंदाच्या पदस्पर्शांची
दूर मात्र ती माय देवकी
बघते लीला दैवगतीची !

# खेळ

बकुळीचा वृक्ष कुठें
नाहीं माझ्या अंगणांत
तरी दरवळे वास
मन पोहतें गंधांत

नाहीं माझ्या अंगणांत
शुभ्र टिपुर चांदणें
तरी झंकारतीं मनीं
कशी तालांत पैंजणें

नाहीं माझ्या अंगणांत
तेज उषेचें हसलें
तरी प्रकाशाचें फूल
हृदयांत उमललें

नाहीं चुकूनहि गेला
मला स्पर्शूनीया वारा
तरी रोमांचते तनु
फुले अनाम फुलोरा

असा कसा खेळ चाले
नसतांहि कुठें कोणी
कशाची ही प्रसन्नता
कोण गाई गोड गाणीं ?

## प्रपंच

प्रपंच आम्ही मांडियलेला
आणि वाहतो त्याची चिंता
ही अमुची लड अमुच्या हातीं
सुटे न त्याचा परंतु गुंता

हवी वाटते पाठीखालीं
लोळायाला गादी गिरदी
पायापिटी ही रोज चालते
—त्यासाठीं तर धांदल-गर्दी !

रंगविताना रंगुन जातो
भवतालीच्या भिंती चारी
राजा, राणी, प्रजा आपुली
यांच्या मधली लज्जत न्यारी

कधी येइ ना मनांत आठव
कुणामुळें हें ?-असें कुणाचें ?
प्रपंच अर्ध्यावरतीं सोडुन
ते तर गेले बांधव अमुचे

त्यांच्या भाळीं लिहिला होता
देशास्तव मृत्यूचा लेख
प्रपंच मांडावे दुसऱ्यांनीं
हीच तयांच्या मनास भूक !

" विश्रांती " या शब्दाशी तर
कधीच त्यांचें नव्हतें नातें
वेदीवर जळुनी अभिमाने
आज होय ते अक्षय जेते

आणि थाटला प्रपंच त्यांनीं
त्यांच्या भावांचा, बहिणींचा
प्रपंचांत या गेलों विसरुन
त्याग आमुच्या भावंडांचा !


३७३६६ कि.
नों. दि. १२-११-७५

# गूज माझ्या अंतरींचें

गूज माझ्या अंतरींचें मीच तें सांगूं कसें ?
मीच सांगाया हवें का लाविलेलें तूं पिसें !

छेडिली वीणा मनींची तूं मलाही नेणतां
शब्द नेले भावनांचे माझिया, ना सांगता
आणि आतां ओठ हलतां होतसें त्यांचें हसें
मीच तें सांगूं कसें ?

यौवनाला चंदनाचा गंध हा आला गडे
या सुवासाचे तुझ्या पायींच घालूं दे सडे
तूं परंतू दाविसी कां–, हें तुला ठावें नसे
मीच तें सांगूं कसें ?

लाज माझी आड येते, ओढिते मागे मला
जाणतोसी प्रेमाला तूं प्रीतिच्या साऱ्या कला
बोलल्यावांचून घे रे, जाणुनी आहे तसें
मीच तें सांगूं कसें ?

# पूजा

घेऊन गंधपूजा आलें तुझ्याच दारीं
हा देह जाळण्याची माझी सदा तयारी

अंगार पेटलेला माझ्या ज्वलंत ओठीं
मावे न भक्ति भोळी आतां मुलींचे पोटीं

जळण्यांत सौख्य माझें सामावलें म्हणून
जळते तुझ्यापुढें मी हा गंध दर्वळून

निर्मून भोवताली वलयें इथें धुराची
ओवाळिते तुला ही पंचारती जिवाची

रक्षा जरी जिण्याची निर्माल्यवत् उरेल
आनंद आत्मदानीं तो आगळा मिळेल

द्यावीस गंधपूजा ही एक आस वेडी
जळणार जो स्वयें त्या जळण्यांतलीच गोडी !

# सीमोल्लंघन

आज करूं द्या सीमोल्लंघन !
बोलून चालून मी तर वारा
वाहत जाइन स्वैर भरारा
रुचे न मजला कधींच कारा
मज ना दिक्कालाचें बंधन !

आजवरी मी तुमच्यासाठीं
निर्मियल्या मजभवती भिंती
रोधुन धरली माझी प्रगती
परी तुम्हाला क्षिती मुळींच न !

जीर्ण विचारांची हीं पानें
अन् थकलेली नाजुक सुमनें
भोगित बसती जिवंत मरणें
हवें कशाला असलें जीवन ?

संकेताच्या त्याच कल्पना
त्याच कृती अन् त्याच वल्गना
कशा घेउं मी गिरक्या-ताना
परिस्थितीच्या सांथीवाचुन ?

पुनश्च करुं द्या निर्मळ रानें
आणि जगूं द्या मज अभिमानें
नेतो पर्णें आणा सोनें—
या भूमीला करुनी वन्दन !

## रंग आणू कोणते ?

चित्र रेखावें कसें मी सर्वव्यापी तूं जिथें
रंग आणूं कोणते ?

जानकीचा राम तूं अन् रुक्मिणीचा शाम तूं
ज्ञानियाच्या विठ्ठला रे, देव तूं अन् धेंड तूं
रूप केव्हा सावळें अन् केधवां हें गोमटें !

राजयोगी भाससी तूं रुक्मिणीच्या मंदिरीं
अन् वियोगाची शिदोरी जानकीच्या कां शिरीं ?
त्याग-भोगा भोगिलें का वेगळाले एकटे ?

तूं दयाळू, तूं कृपाळू, तूं जगाची सावली
मी तुझ्या रूपागुणा लावूं कशी नामावली ?
कुंचल्याचे स्पर्श माझ्या आज हे होती थिटे
रंग आणूं कोणते ?

# अभंग माझा

अभंग माझा एकतारिघर
गाई रुपडें तुझेंच सुंदर

तुझीं पावलें सान गोजिरीं
कुंकुमरंगांकित झालेलीं
उघड्या अंगा उटी केशरी
श्रीपदलांछन तव वक्षावर

वैजयंतिची काळी माला
तुला शोभते रे, गोपाळा
स्वैर बांधिसी कटिला शेला
हास्य सदाचें तुझ्या मुखावर

शंख चक्र अन् गदा घेउनी
सदा उभा तूं भक्त-रक्षणीं
पद्मविभूषण, कमल हुंगुनी
कमलफुलाहुन असशी कोमल

## चित्र मी रेखाटतें

मानसींच्या माधवाचें चित्र मी रेखाटतें
गोकुळींचा तो गुराखी सारखा मी शोधतें

खोवतो केव्हा तुरे तो पल्लवांचे मस्तकीं
गोपिकेला कंचुकी केव्हा करी तो पारखी
सावळ्याची बासरी वेडावुनी मी ऐकते

रंग माझे रंगती लीला अशा रेखाटतां
स्वप्न हें कीं सत्य तें हें ना मला ये सांगतां
आणि मी वेडयापरी चित्रांत त्याशीं बोलतें

ध्यास माझ्या लोचनांना एक त्याचा सारखा
शाम माझा ना मला व्हावा जराही पारखा
व्हायचें नाहीं पुरें हें चित्र, हें मी जाणतें
मानसींच्या माधवाला मी तरी रेखाटतें

# मला आहे रंगरूप

मला आहे रंगरूप
मला कळे माझा शब्द
नको आभाळ विशाळ
जिथे फक्त अब्द अब्द !

माझ्या थिट्या पंखांतहि
मला पुरेशी ही ऊब
नाही मेघ-वर्षावांत
मला भिजायाचें चिंब

माझे पंख जाणतात
मला झेपणारी झेप
भलत्याला लोटांगण
त्यांना वाटतें तें पाप !

मला जाणणारी आहे
माझी माझ्यावर भक्ति
श्रद्धेवांचून पांगळी
मानवाची सारी शक्ति

## ज्ञानाचिया मंदिरीं

ज्ञानियाच्या मंदिरीं ये भक्ति वीणा छेडित
अमृताचे बोल येथें व्हायचे सालंकृत

भक्तिपंथाचा नवा पायाच ज्यांनी घातला
आणि ज्याचें लेण पोंचे पंढरीला आजला
ज्ञानदेवांच्या घरीं त्या ज्ञान आहे नाचत

" बोल बोलूंया मऱ्हाटी " हेंच होतें ज्या पिसें
हें मराठीला चढे त्याचेंच आता बाळसें
ज्ञान-भक्ती-कर्म यांचें भाष्य चाखी लज्जत

पोर होता कोवळा होता परी तो आगळा
शारदेला तेज अन् सारस्वता लावी लळा
शब्दसृष्टीचा प्रभू व्हावा कसा शब्दांकित ?

## धीट

माझिया ओठांत
जुळतीं अक्षरें
तुझेंच हें बा रे,
वरदान !

तुझेंच आकाश
तुझाच प्रकाश
त्यांत कासावीस
होतसें मी !

आणि गालावर
वाहतीं आसवें
ज्यांत पाझरावे
भाव वेडे

पांडुरंगासाठीं
शब्दांची ही वांट
फेकावया धीट
केलेंस त्वां !

REFBK-0013469
REFBK-0013469

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 36364 दि.
93899
दा. क.